दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक १९ • Title - Code :- MAHMAR4951 • शुक्रवार दि.०६ ऑक्टोबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# मोदी सरकारने ओबीसींना शैक्षणिक व आर्थिक क्षेत्रात प्रगतीचा मार्ग दाखविला

## भाजपा ओबीसी जागर मेळाव्यात हंसराज अहीर यांचे प्रतिपादन

**चंद्रपूर– देशातील सर्वात मोठ्या ओबीसी समुदायाच्या सामाजिक, शैक्षणिक आर्थिक व व्यावसायीक विकासाला खड्डुयात लोटण्याचे काम गेल्या ६० वर्षात झाले. भाजपाची नियत साफ असल्याने सर्वांची साथ व सर्वांचा विकास या भूमिकेतून मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशात पहिल्यांदाच ओबीसींच्या उत्थानाचे, सर्वांगिन विकासाचे कार्य केले. ओबीसींकरीता अनेक कल्याणकारी योजना राबवित त्यांचे मागासलेपण दूर सारून त्यांना शैक्षणिक व आर्थिक क्षेत्रात प्रगतीचा मार्ग दाखवित राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचे महान कार्य भाजपा सरकार व मोदीजींच्या राजवटीत झाले असल्याने भाजपा हा पक्षच खऱ्या अर्थाने ओबीसींचा तारणहार असून ओबीसी बांधवांनी काळाची पाऊले ओळखून भाजपाची सोबत करण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पुर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी केले.**





भाजपा ओबीसी मोर्चाच्या वतिने ओबीसी संपर्क अभियानाअंतर्गत महात्मा गांधी जयंती दिनी (२ ऑक्टों.) सुरू झालेल्या ओबीसी जागर यात्रेचे चंद्रपूरात आगमन झाल्यानंतर महानगर ओबीसी मोर्चाच्या वतिने दि. ५ ऑक्टोंबर रोजी तुकूम येथील महेश भवनात आयोजित ओबीसी जागर महामेळाव्याला अहीर संबोधित होते. या ओबीसी जागर मेळाव्यास भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश प्रभारी डॉ. आशिष देशमुख, ओबीसी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष संजय गाते, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. अशोक जिवतोडे, प्रदेश महिला महासचिव अर्चना डेहनकर, प्रदेश उपाध्यक्ष सोनटक्के, रविंद्र चव्हाण, डॉ. प्रविण येनूरकर, रविंद्र उदासे, निलेश गुळधे, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, ज्येष्ठ नेते विजय राऊत, माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, महानगर अध्यक्ष राहुल पावडे, प्रदेश महिला मोर्चा च्या महामंत्री अल्का आत्राम, माजी आमदारव्दय संजय धोटे, सुदर्शन निमकर, खुशाल बोंडे, अनिल फुलझेले, ब्रिजभुषण पाझारे, रघुवीर अहीर, रमेश राजुरकर, नामदेव डाहुले, विवेक बोढे, विशाल निंबाळकर, विनोद शेरकी, वंदना संतोषवार, प्रभुती व्यासपीठावर उपस्थित होते. प्रारंभी सदर जागर यात्रा बाईक रॅली ने शासकीय विश्रामगृह पासून ते कार्यक्रम स्थळापर्यंत कुच करीत सभास्थळी आली.या मेळाव्यात उपस्थितांना मार्गदर्शन करतांना हंसराज अहीर म्हणाले की, देशात अनिर्बंध सत्ता उपभोगणाऱ्यांनी ओबीसींच्या हिताचे धोरण कधीही स्वीकारले नाही. काका कालेलकर, आयोग असो की, मंडल आयोग असो शिफारसी स्विकारल्या नाहीत त्यासाठी व्हि. पी. सिंह यांचे भाजपासोबत सरकार यावे लागले. १९९३ मध्ये ओबीसी आयोग स्थापन झाले मात्र आयोगाला संवैधानिक दर्जा मिळण्यासाठी मोदीजींचे सरकार यावे लागले. आज मोदीजींच्या राजवटीत ओबीसींना वैद्यकीय, इंजिनियरींग व उच्च शिक्षणात आरक्षण मिळत आहे. या पुर्वी एससी, एसटी बांधवांना संवैधानिक अधिकार मिळायचा आज भाजपा राजवटीत ओबीसींना हा अधिकार बहाल केला गेला आहे. शेतीवर ८० टक्के ओबीसी आहे. मोदींनी कृषी मालाचे भाव दुप्पट केले. कारागीरांना विश्वकर्मा योजनेतून बळ दिला. कौशल्य विकासातून रोजगार निर्मीती केली. स्वदेशी उत्पादनास बळ दिले. यात ओबीसींचा मोठा वाटा राहणार आहे. त्यामुळे ओबीसींचे हित कोणत्या पक्षात आहे याचा विचार ओबीसी बांधवांनी करण्याची गरज असल्याचे हंसराज अहीर म्हणाले.यावेळी प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेची गणेश विसर्जन सोहळ्यात दृष्ये सादर करणाऱ्या गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचा हंसराज अहीर व उपस्थित मान्यवरांनी शाल, श्रीफळ व रोख रक्कम देवून सन्मान केला. या स्पर्धेत ४१ हजाराचा प्रथम पुरस्कार जोड देउळ गणेश मंडळ, ३१ हजाराचा व्दितीय पुरस्कार युवक गणेश मंडळ गंजवार्ड, २१ हजाराचा तृतीय विठ्ठल व्यायामशाळा गणेश मंडळ, चौथे हिवरपूरी बाल गणेश मंडळ व पाचवे जय बजरंग गणेश मंडळास पुरस्कार प्रदान करण्यात आला.या जागर मेळाव्याच्या यशस्वितेसाठी ओबीसी मोर्चाच्या महानगर पदाधिकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रविंद्र गुरनूले यांनी केले. संचालन राहूल बनकर यांनी तर आभार शशिकांत म्हस्के यांनी मानले. या जागर मेळाव्यास ओबीसी समाजातील बहुसंख्य नागरीक तसेच भाजपा, भाजयुमो महिला आघाडी व विविध आघाड्यांचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# गडचिरोली जिल्ह्यातील १११ ग्रा.पं. निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

**गडचिरोली । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सार्वत्रिक ,पोट निवडणूक असलेल्या एकूण १११ ग्रामपंचायतींचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्य ३ ऑक्टोबर २०२३ च्या आदेशान्वये माहे जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायती, नव्याने स्थापित व सन २०२२ मध्ये चुकीची प्रभागरचना झाल्यामुळे निवडणूका न होऊ शकलेल्या ग्रामपंचायतींच्या (सदस्य पदासह थेट सरपंच पदाच्या) सार्वत्रिक निवडणूकासाठी संगणकप्रणालीद्वारे तसेच ग्रामपंचायतीतील रिक्त जागांच्या पोटनिवडणूकांसाठी पारंपारीक पद्धतीने प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम गडचिरोली जिल्ह्यात खालीलप्रमाणे राबविण्यात येत आहे.तहसिलदार यांनी निवडणुकीची नोटीस प्रसिध्द करण्याचा दिनांक ६ ऑक्टोबर २०२३ (शुक्रवार), नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक व वेळ (संबधित तहसिल कार्यालयाचे ठिकाणी ) १६ ऑक्टोबर (सोमवार) ते २० ऑक्टोबर २०२३ (शुक्रवार) सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत, नामनिर्देशनपत्र छाननी करण्याचा दिनांक व वेळ (संबधित तहसिल कार्यालयाचे ठिकाणी) २३ ऑक्टोबर (सोमवार) रोजी सकाळी ११ वाजतापासून छाननी संपेपर्यंत, नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक व वेळ २५ ऑक्टोबर (बुधवार) रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत, निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ २५ ऑक्टोबर (बुधवार ) दुपारी ३ वाजतानंतर, आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक ५ नोव्हेंबर २०२३ (रविवार) (गडचिरोली जिल्हयासांठी स.७.३० वा.पासून ते सायंकाळी ५.३० वा.पर्यंत) आणि मतमोजणीचा ७ नोव्हेंबर २०२३ (मंगळवार) रोजी होईल. तरी वरीलप्रमाणे निवडणूक कार्यक्रम शांततेत व सुरळीतपणे पार पाडण्यासाठी मतदारांनी/नागरिकांनी सहकार्य करावे, असे जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्याकडून आवाहन करण्यात येत असल्याचे निवडणूक विभाग, गडचिरोली यांनी कळविले आहे.



**अशी आहे निवडणूक होणा–या (सार्वत्रिक/पोट) ग्रामपंचायतींची संख्या :**

**कोरची – १७ ग्रामपंचायती, कुरखेडा – ४, देसाईगंज – १, आरमोरी – १, गडचिरोली – ६, धानोरा – २६, चामोर्शी – ७, मुलचेरा – ४, अहेरी – ६, ऐटापल्ली – १३, भामरागड – १४ आणि सिरोंचा तालुक्यातील १२ अशा एकूण १११ ग्रामपंचायतींची सार्वत्रिक / पोट निवडणूक होणार आहे.**

# दुचाकीस्वारांनो ! स्वत:च्या व कुटुंबाच्या सुरक्षेसाठी हेल्मेट घाला

## रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत जिल्हाधिका–यांचे कळकळीचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जानेवारी ते ऑगस्ट २०२३ या कालावधीत जिल्ह्यात एकूण ५३४ अपघातांची नोंद झाली असून २३३ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. जिल्ह्यात झालेल्या एकूण अपघातांपैकी फक्त दुचाकीच्या अपघातांची संख्या २७५ आहे. यात १२९ जण मृत्युमुखी पडले आहे. दुचाकीवर हेल्मेट घातले असते तर कदाचित मृत्युचा आकडा कमी होऊ शकला असता. त्यामुळे दुचाकीस्वारांनो, स्वत:च्या व कुटुंबाच्या सुरक्षेसाठी कृपाकरून हेल्मेट घाला, असे कळकळीचे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयात रस्ता सुरक्षा समितीचा आढावा घेतांना ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी, सहाय्यक जिल्हाधिकारी मुरूगानंथम एम., अतिरिक्त पोलिस अधीक्षक रिना जनबंधू, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, सा.बा. विभागाचे अधिक्षक अभियंता अरुण गाडेगोणे, कार्यकारी अभियंता सुनील कुंभे, मुकेश टांगले, उप–प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे प्रकल्प संचालक श्री. जिचकार, वाहतूक निरीक्षक प्रवणीकुमार पाटील, राज्य परिवहन महामंडळाच्या विभागीय नियंत्रक स्मिता सुतावणे, शिक्षणाधिकारी (माध्य.) कल्पना चव्हाण आदी उपस्थित होते.दुचाकीने वाहतूक करतेवेळी हेल्मेट घालणे अतिशय महत्वाचे आहे, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, त्यामुळे आपण स्वत: तर सुरक्षित राहतोच, मात्र आपले कुटुंबसुध्दा सुरक्षित राहू शकते. अपघात टाळण्यासाठी जिल्ह्यातील मुख्य रस्त्यांची सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलिस विभाग आणि उप–प्रादेशिक परिवहन विभागाने संयुक्त पाहणी करावी. तसेच त्रूटी किंवा उणिवा असल्यास तत्परतेने त्या पूर्ण कराव्यात. जेणेकरून वाहतूक करतांना नागरिकांना त्रास होणार नाही. रस्त्यावर वारंवार खड्डे पडणार नाही, याबाबत कामाचे योग्य नियोजन करावे. खड्डे पडत असलेल्या रस्त्यांची दर्जेदार आणि कायमस्वरूपी दुरूस्ती करणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील टोल नाक्यावर तिनही विभागांनी संयुक्त पाहणी करून वाहतुकीचे नियम, रस्त्याची वेगमर्यादाबाबतचे फलक, सुरक्षित वाहतुकीबाबत दृकश्राव्य माध्यमातील ऐकू येणा–या सुचना आदींची तपासणी करावी. जिल्ह्यात किंवा शहरात ज्या ठिकाणी सिग्नल व्यवस्था आहे, त्या ठिकाणी झेब्रा क्रॉसिंग अतिशय सुस्पष्ट दिसली पाहिजे. जिल्ह्यात निश्चित करण्यात आलेले ब्लॅकस्पॉट व संभाव्य ब्लॅकस्पॉट ठिकाणांना पोलिस, सार्वजनिक बांधकाम आणि उप–प्रादेशिक परिवहन विभागाने भेट द्यावी. अपघात टाळण्यासाठी ब्लॅकस्पॉटवर काय उपाययोजना करण्यात येत आहे, त्याचा अहवाल पुढील बैठकीत सादर करावा, अशा सुचनाही जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिल्या.सादरीकरण करतांना उप–प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे यांनी सांगितले की, सन २०२१ मध्ये जिल्ह्यात एकूण ७१८ अपघात झाले होते. त्या तुलनेत सन २०२२ मध्ये अपघातांची संख्या ४७४ होती. चालू वर्षी २०२३ मध्ये मात्र पहिल्या ८ महिन्यात अपघातांची संख्या ५३४ पर्यंत पोहचली आहे. यावेळी जिल्ह्यातील नवीन ब्लॅकस्पॉट, पोलिस आणि परिवहन विभागाने केलेली कार्यवाही, आवश्यकता असलेल्या रस्त्यावर गतिरोधक लावणे, रस्ता सुरक्षा अभियान व त्यावरील उपाययोजनेसाठी लागणा–या खर्चास मान्यता देणे, रस्त्यावरील जड वाहने हटवून नो–पार्किंग झोन घोषित करणे आदींबाबत चर्चा करण्यात आली.

## शब्द वेध


### वाह रे ‘आदर्श ! ’

तू माझा ’ बाप ’ काढतोस
मी तुझा बाप काढतो !
कळतच नाही, आपल्या
घाण राजकारणातून......
लोकांसमोर आपण काय
आदर्श (?) मांडतो !
दिसून येते अखेर, कुणालाच
तत्वा चे काही पडले नाही...
एकही दिवस जात नाही असा
की, टिव्ही तून हे, कधी
(ओ) रडले नाही.....!!



सुभाष उसेवार
९०११२६२४३९

# अंबाजोगाई महावितरण विभागातील सर्व अभियंता आंदोलनाच्या भूमिकेत



**बीड । प्रतिनिधी**

महावितरण अंबाजोगाई विभागातील कार्यकारी अभियंता वाघमारे यांच्या अनागोंदी कारभाराला कंटाळून डए- संघटनेने आंदोलनाच्या पवित्रा घेतला आहे. कार्यकारी अभियंता वाघमारे हे मेंटेनन्स करिता मटेरियल उपलब्ध करून देत नाहीत, महावितरण ग्राहकांना सेवा देण्यास टाळाटाळ करतात. दुरुस्ती करिता लागणाऱ्या साहित्यासाठी ठेकेदारावर अवलंबून राहावे लागते. लोकप्रतिनिधींचे कामे करण्यासाठी पण ते मानसिकता ठेवत नाहीत व सभासदांना जनतेच्या रोषास सामोरे जावे लागते. संघटनेच्या सभासदांच्या अडचणी सोडन्यासही असमर्थता दाखवतात. जनआंदोलनास, मोर्चास सामोरे जात नाहीत.

अशा जनहितार्थ काही सेवा असतील यासाठी खालील कर्मचाऱ्यास काम करताना त्रास होतो. या सर्व गोष्टींना कंटाळून सर्व अभियंतांनी आंदोलन सुरू करण्याच्या पावित्र्यात आहेत. दि. ०६/१०/२०२३ रोजी पासून सर्व अभियंता कंपनीचा मोबाईल वापरणार नाहीत, कार्यालयीन वेळे व्यतिरिक्त बैठकांना हजर राहणार नाहीत, सर्व अतिरिक्त कारभार सोडणार आहेत. असे संघटनेचे विभागीय पदाधिकारी विकास जोगदंड ,शहाणे यांनी आपल्या पत्रकात सांगितले आहे आंबेजोगाई विभागातील सर्व अभियंते यात सहभागी असणार आहेत. करिता जनतेचे काही गैर सोयीबद्दल सर्वस्वी कार्यकारी अभियंता वाघमारे हे कारणीभूत राहतील. याची दखल वरिष्ठ प्रशासनाने न घेतल्यास अभियंते कधीही काम बंद आंदोलन सुरु करतील.

# नांदेड रुग्णालयातील मृत्यू प्रकरणी दोषींवर कारवाई करणार

## : मुख्यमंत्री शिंदे यांची घोषणा

**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड आणि घाटी येथील रुग्णालयांमध्ये झालेल्या मृत्यू प्रकरणातील दोषींवर कडक कारवाई केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री शिंदे केली.

नांदेड शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयातील रुग्णांच्या मृत्यूनंतर राज्यात खळबळ उडाली.यातील मृत्यूकांडाची चौकशी करण्यासाठी छत्रपती संभाजीनगरातील तीन तज्ज्ञ डॉक्टरांची समिती मंगळवारपासून येथे कार्यरत आहे. या समितीच्या चौकशीचा अहवाल राज्य शासनाकडे देण्यात येईल असे सांगण्यात आले आहे. नांदेड आणि घाटी येथील रुग्णालयांमध्ये झालेल्या मृत्यू प्रकरणाच्या चौकशीसाठी राज्यस्तरीय समिती नेमण्यात आली असून दोषींवर कडक कारवाई केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री




शिंदे यांनी . ५ ऑक्टोबर ला बैठकीत केली. तसेच औषध खरेदीचे जिल्हाधिकाऱ्यांनाही अधिकार देण्यात आले आहेत. त्यामुळे औषध खरेदीत विलंब होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

# शेती आणि वन्यजीवांचा उपद्रव

**शेती व्यवसाय करताना शेतकऱ्यांना अनेक समस्यांना समोर जावे लागते. त्यापैकी एक समस्या म्हणजे स्वतःच्या शेताचे, शेतातील मालाचे संरक्षण करणे. अलीकडे वन्यजीव त्यांचे जंगलक्षेत्र सोडून शेतशिवारामध्ये फिरत असतात. मानवी वस्त्यांचा आधार घेतात. आपल्या पिकाची राखण करताना कळत नकळत ते शेतकऱ्यांकडून बळी जात असतात. शेतकऱ्यांचा उद्देश त्यांना मारणे हा नसतो तर पिकाचे रक्षण करत असताना नकळत त्या घटना घडतात.परंतु त्यासाठी बळी जातो तो शेतकऱ्याचा. म्हणून वनविभागाने आपल्या प्राण्यांचे रक्षण करावे आणि शेतकऱ्यांना त्यांचा उपद्रव होणार नाही याची काळजी घ्यावी. असे जर झाले तर शेतकरी बिनधास्तपणे आपल्या शेताची व शेतातील मालाची निगराणी करू शकतील. शेतकऱ्यांसाठी उपद्रवी ठरणारे कायदे वनविभागाने रद्द केले पाहिजे. वन्यजीव ही जंगल खात्याची संपत्ती आहे त्याचे संरक्षण आणि संवर्धन कसे करावे हा त्यांचा प्रश्न आहे. शेतमाल आणि शेती हे शेतकऱ्यांचे धन आहे. त्याचे संवर्धन आणि संरक्षण करणे हे शेतकऱ्यांचे कर्तव्य आहे. या द्वंद्वात शेतकरी उगाच भरडला जाऊ नये हीच शेतकऱ्यांना अपेक्षित आहे.**



शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे असे मोठ्या अभिमानाने म्हटले जाते. कारण त्याने जमिनीत पेरलेल्या ४० दाण्यांचे ४०० दाण्यात रूपांतर करण्याचे कौशल्ये आत्मसात केले आहे. परंतु हे करताना त्याला किती मोठमोठ्या कसोटीला सामोरे जावे लागते हे त्याचे त्यालाच माहिती असेल. मराठीमध्ये एक म्हण आहे. जावे ज्याच्या वंशा, तेव्हा कळे कुणाच्या समस्या समजून घेण्यासाठी त्याच्याच वंशात जन्म घ्यावा लागतो. निदान सहवासात तरी यावं लागतं.तेव्हाच त्या कळतात. उगाच त्या कळल्याचे सोंग आणून जमत नाही. मुळात कुठल्याही समस्या समजून घेण्यासाठी त्या समस्येच्या मुळाशी जावे लागते. शेतकऱ्यांना शेतकरी राजा असे म्हणत असले तरी या राजाला जीवन जगण्यासाठी किती तारेवरची कसरत करावी लागते हे त्याचे त्यालाच माहीत. त्याच्या कळा समजण्यासाठी शेतकरी कुटुंबातील भाग व्हावं लागतं.जीवन अनुभवायला लागतं.शेती व्यवसाय करताना कराव्या लागणाऱ्या अनेक कसरतींपैकी एक कसरत म्हणजे शेतातील पिके सुरक्षित बाहेर काढणे. अनेकदा शेतामध्ये पिकलेला माल घरी न्यायच्या ऐनवेळेस त्याच्यावर काहीतरी नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती येते. परिणामतः त्याला त्या मालापासून मुकावे लागते. वर्षभर बघितलेली स्वप्न एका रात्री उद्ध्वस्त होतात. शेतकरी शेतामध्ये माल पिकवतो. तो आपण मोठ्या चवीने खातो. पण तो पिकवितांना त्याला अनेक दिव्यातून जावे लागते हे शहरी लोकांना माहिती नाही. ज्यांचा शेतीशी काडीचाही संबंध आला नाही त्यांना या गोष्टी कळणार कशा? शेतकऱ्यांच्या असलेल्या अनेक शत्रूपैकी एक शत्रू म्हणजे जंगली श्वापदे.जंगली श्वापदे म्हटले की, आपल्यासमोर जंगलात राहणारे प्राणी असे चित्र उभे राहिले असेल. परंतु जंगली म्हणजे जरी ते जंगली असले तरी त्यांचे अलीकडे वास्तव्य गावात आणि शेतशिवारात वाढलेले आहे असे जंगली प्राणी. माणसाने जंगली श्वापदांच्या वापराच्या हक्काच्या जागेवर अतिक्रमण केल्यामुळे वा मानवनिर्मित अतिक्रमणामुळे कधीकाळी जंगलात राहणाऱ्या या जंगली प्राण्यांना आता मानवी वस्त्यांचा आधार घ्यावा लागतो. त्यांना मानवी वस्त्यांमध्ये येऊन राहावे लागते. त्यांना मानवी वस्त्यांत निवारा शोधावा लागतो .तेव्हा कळत नकळत अनेकदा ते शेतकऱ्यांच्या धुऱ्याशी येतात. या मुक्या जीवाला धुरा म्हणजे काय ते कसे कळणार? बिचारे मुके जीव पोट भरण्यासाठी ते येत असतात. कळत न कळत पोटाची भूक भागविण्यासाठी आपला जंगलातील सुरक्षित भाग सोडून मिळेल त्या दिशेने वावरत असतात. त्याच दिनकर्माचा भाग म्हणून त्यांना अनेकदा शेतकऱ्यांच्या धुऱ्याशी पोहोचतात. मिळेल ते खायची अशा बाळगून ही जनावरे शेतीमध्ये शिरतात. शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील मालाच्या सुरक्षेसाठी बंदोबस्त केलेला असतो. तारेचे कुंपण, काठीचे कुंपण वा आणखी अन्य प्रकारची सुरक्षा. ही जमेल तशी तो करण्याचा प्रयत्न करतो. तो कधी शेतामध्ये जागली जातो. शेतामध्ये स्वतःची झोप खराब करून रात्रभर जागून जंगली जनावरांना बाहेर पिटाळून लावतो. कधी फटाक्यांचे आवाज, कधी डपड्यांचा आवाज, कधी स्वतःच्या तोंडातून भेसूर आवाजात ओरडत या माध्यमातून तो जंगली जनावरांना शेतामध्ये येण्यापासून अप्रत्यक्षपणे परावृत्त करतो. काही शेतकरी आपल्या शेताच्या सभोवती तारेचे कुंपण लावतात. सारे गाव झोपल्यानंतर त्या कुंपणाला विद्युत करंट जोडतात. अनेकदा शेतकरी बांधव या करंटच्या तंत्रज्ञानाविषयी अजाण असल्यामुळे त्यांना त्यातील बारकावे कळत नाही. अशा शेतामध्ये जंगली जनावर आली की त्या करंटला लागून ती मरतात. सकाळी शेतकरी शेतावर जातो तेव्हा त्याला त्या शेताच्या शेजारी एखादे जंगली श्वापद मरून पडलेले दिसते. तेव्हा तो घाबरून जातो. आता आपण पकडले जाऊ या भीतीने हवालदिल होतो. स्वतःच्या लेकरांच्या पोटात दोन घास पडावे म्हणून रात्ररात्र जागरण करणाऱ्या शेतकऱ्याने आपल्या शेताच्या सुरक्षेसाठी लावलेल्या करंटमुळे जनावर मेले यामध्ये त्या शेतकऱ्याचा दोष काय? तरीही आपले मायबाप सरकार आणि वनप्रशासन त्या मृत्यूसाठी शेतकऱ्यांनाच दोषी पकडतात. जनावर मारायला तो जंगलामध्ये गेला होता का? शेताच्या सुरक्षेसाठी त्यांनी आपली स्वतःची व्यवस्था केली होती. त्या व्यवस्थेमध्ये ते जनावर सापडले. त्यात शेतकऱ्याचा दोष मानता येणार नाही.मात्र अशा घटना घडतात तेव्हा एखाद्या गुन्हेगाराला वागवावे त्याप्रमाणे शेतकऱ्यांना जंगलखाते वागवतात. कधीकाळी इज्जतीने जगणारा हा शेतकरी आपल्या हातून कळत नकळत घडलेल्या या गुन्ह्यासाठी अपराधी ठरतो. जंगल ही ही सरकारची संपत्ती आहे. त्यांचे संरक्षण करणे हे सरकारी अधिकाऱ्यांचे काम आहे. जंगल अधिकाऱ्यांचे काम आहे. त्यांचे अधइनस्त जंगली प्राणी जर शेतकऱ्यांच्या खाजगी क्षेत्रामध्ये येत असेल तर याला जबाबदार वनविभागाला पकडले पाहिजे. दुसऱ्याचे अधिकार क्षेत्रामध्ये येऊन त्यांच्या पिकाची नासाडी करून त्या शेतकऱ्यांनाच दोषी पकडणे नियमबाह्य समजले पाहिजे. शेतकऱ्यांनी स्वतःच्या पिकाच्या रक्षणासाठी शेतमाला सभोवती जो काही बंदोबस्त केला वा करंट लावला आणि त्यात जंगली जनावर मेले तर दोष शेतकऱ्यांना देऊ नये. तो एक अपघात समजावा. कारण कुठल्याही शेतकऱ्याला त्या जनावराला मारायचे नसते. सारे गाव झोपल्यानंतर आपल्या पिकाच्या रक्षणासाठी त्यांनी ते केलेले असते. स्वतःच्या जीवाचे रक्षण करणे, मालाचे रक्षण करणे हे प्रत्येकाचे काम आहे. स्वतःच्या कुटुंबाचे पालनपोषण करणे हे प्रत्येकाचे काम आहे. त्यासाठी बिचारे शेतकरी दिवस–रात्र राबतात. अनेकदा पिकाच्या रक्षणापायी त्याला रात्रीची झोपही नशिबी नसते. शेतकऱ्यांना माणूस म्हणून जगण्याचा काही अधिकार आहे की नाही. शेतशिवारात नकळत झालेल्या चुकीला त्याला दोषी पकडून त्याच्यावर कारवाई करणे हे चुकीचेच आहे. शेतमालाचे रक्षणासाठी त्यांनी उभारलेल्या कक्षेत आपली जनावर येऊ नये याची काळजी जंगल विभागाने घेतली पाहिजे. काय करायचे त्या उपयोजना त्यांनी कराव्या. जंगली जनावरे गावात येणार नाही यासाठी त्यांनी प्रयत्न करावे. शेतकऱ्यांच्या शेतात विनाकारण धुडगूस घालून शेतकऱ्यांची नुकसान केले तर कुठला शेतकरी ऐकणार आहे. उदाहरणार्थ रानटी डुक्करांचे घ्या .अनेक रानटी डुक्करे शेतकऱ्यांच्या शेतामध्ये धुडगूस घालतात.अतोनात नुकसान करतात. शेतकऱ्यांनी मारले तर त्या शेतकऱ्यावर कारवाई होते. मात्र या रानडुक्करांनी शेतमालाचे नुकसान केले त्याचे काय? शेतकऱ्यांनी का नुकसान सहन करण्यासाठीच जन्म घेतला आहे का? ठेका घेतला आहे का आपले नुकसानच नुकसान सहन करायचा. एकीकडे शेतमालाला योग्य भाव मिळत नाही. दुसरीकडे रानटी डुकरांमुळे शेतीचे होणारे अतोनात नुकसान. या दुहेरी चक्रव्यूहात शेतकरी सापडतो. इकडे डुक्कर मारता येत नाही आणि तिकडे सोडताही येत नाही. अशा दुहेरी चक्रव्यूहात शेतकरी राजा सापडलेला आहे. वनविभागाने वन कायद्यात दुरुस्ती करून डुकरासारख्या प्राण्यांचा बंदोबस्त करायला हवा.ही जनावरे शेतकऱ्यांच्या हद्दीमध्ये घुसणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. जे काय तंत्रज्ञान वापरायचे ते वापरले पाहिजे. परंतु उगाच शेतकऱ्यांना त्याचा मनस्ताप होणार नाही यासाठी वनविभागाने पावले उचललीच पाहिजे. ते जर होत नसेल तर कळत नकळत शेतकऱ्यांच्या हातून जराशी रानडुकरे मारल्या गेली वा जंगली प्राणी मारल्या गेल्यास त्यांना कारवाईपासून संरक्षण मिळाले पाहिजे. रानडुकरांची पैदास दरवर्षी मोठ्या प्रमाणामध्ये होत असते. वर्षभरात एका डुकराची अनेक डझन पिल्ले पैदा होत असतात. त्या डझनभरापासून शेकडो डुकराची भर पडत असते. डुकरांचा जन्मदर हा गुणोत्तर पद्धतीने आहे. तेव्हा डुकरांच्या मरणाच्या घटना घडल्या तर शेतकऱ्यांना विनाकारण कायदेशीर प्रक्रियेमध्ये गुंतवून त्याच्यावर अत्याचार केल्यासारखे आहे. वनविभागाचे अनेक कायदे शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी आहे.मनस्ताप देणारे आहे. त्यातील महत्त्वाचा मनस्ताप म्हणजे शेतपरिसरात येणाऱ्या वन्यजीवांच्यापासून शेतमालाचे संरक्षण करणे व ते करत असताना कळत नकळत झालेल्या चुकांचे धृवीकरण करून शासनाने त्यांना मनस्ताप देणे हे आहे. शासनाने जर मनामध्ये आणले तर ते शेतकऱ्यांसाठी बरेच काही करू शकतात. परंतु शेतकरी सुखी झाला तर अनेकांची पोट दुखण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना या ना त्या कारणाने प्रत्यक्षाप्रत्यक्ष शासन व्यवस्थाही आपल्या जंजाळात गुंतवून ठेवत असते.अशा अनेक जंजाळांपैकी एक म्हणजे वन्यजीवांचा शेतकऱ्यांच्या शेतशिवारात होणारा शिरकांव. अनेकदा वाघासारखे भयावह प्राणी वा त्याचे अस्तित्व शेतशिवारामध्ये असेल तर शेतकऱ्याला स्वतःच्या शेताचे संरक्षण करण्यासाठी जाता येत नाही. अनेकदा जंगलातील जनावर शेत शिवारात येत असल्याने त्याला स्वतःच्या पाळीव प्राण्यांसाठी चारा आणता येत नाही. स्वतःच्या डोळ्यांनी त्याला लेकाबाळाप्रमाणे वाढवलेल्या प्राण्याला उपाशी मरताना पाहावे लागते. किंवा स्वतःच्या जीवावर उदार होऊन शेतात जावे लागते. शेवटी शेतकरी हा माणूस आहे. तेव्हा त्याच्या वेदना व्यथा त्रास समजून घेणे हे आपले काम नाही का?

**राज्य शासनाच्या विविध योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचाव्यात, शासनाकडून राबविण्यात येणारे विविध उपक्रम, त्या उपक्रमांतून जनतेला लोक कल्याणकारी योजनांचा लाभ मिळाव, त्यांच्या अडी–अडचणी दूर करता याव्यात. यासाठी शासनाने गतवर्षीपासून सेवा महिना हा विशेष उपक्रम हाती घेतला आहे. राज्य शासनाकडून हा उपक्रम सलग दुसऱ्या वर्षीही राबविण्यात येत आहे. राज्य शासनाच्या 'शासन आपल्या दारी' या अभियानाच्या यशस्वीतेनंतर प्रशासन पातळीवर 'सेवा महिना' हा कार्यक्रम राबवत शासन जनतेप्रती कायमच बांधील असल्याचे अधोरेखित आहे.**

# शासकीय कामकाज गतिमान करणारा 'सेवा महिना'

**प्रभाकर बारहाते**
**माहिती अधिकारी,परभणी**

सर्वसामान्य जनतेची कामे विहित कालावधीत पूर्ण व्हावीत, यासाठी राज्य शासनाने २०१५ पासून 'आपले सरकार सेवा पोर्टल' सुरु केले आहे. या पोर्टलच्या माध्यमातून राज्यातील जनतेची कामे वेळेत पूर्ण होण्याच्या प्रमाणात बरीच वाढ झाली आहे. राज्य शासनाकडून नागरिकांना मिळणाऱ्या सेवा अधिक गतिमानतेने मिळाव्यात, यासाठी राज्य शासनाने गतवर्षी १७ सप्टेंबर २०२२ ते २ ऑक्टोबर २०२२ पर्यंत 'सेवा पंधरवडा' राबविला होता व त्याला पुढे ५ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. राज्य शासनाच्या विविध क्षेत्रीय कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देणे तसेच त्यांना योजनांचा योग्य लाभ देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. शासन आणि शासनाच्या कामकाजाबद्दल नागरिकांचा विश्वास वृद्धिंगत व्हावा, यासाठी यावर्षी पुन्हा एकदा १७ सप्टेंबर ते १६ ऑक्टोबर २०२३ पर्यंत 'सेवा महिना' उपक्रम राबवण्यात येत आहे.

'सेवा महिना' उपक्रमात समाविष्ट सेवा अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नवीन शासन निर्णयानुसार मदत निधींचे लाभ देणे, वितरण करणे, पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेतील लाभार्थ्यांना तांत्रिक अडचणीमुळे प्रलंबित असलेल्या पात्र प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे, फेरफार नोंदीचा निपटारा करणे, पात्र लाभार्थ्यांना शिधापत्रिकांचे वितरण, मालमत्ता हस्तांतरण नोंद घेणे, नव्याने नळजोडणी देणे, मालमत्ता कराची आकारणी करणे व मागणी पत्र देणे, प्रलंबित घरगुती विद्युत जोडणीस मंजुरी देणे, मालमत्ता हस्तांतरणानंतर विद्युत जोडणीमध्ये नवीन मालमत्ताधारकाचे नाव नोंदविणे, बिरसा मुंडा कृषी क्रांति योजने अंतर्गत सिंचन विहिरींकरिता अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी करून घेणे, अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना प्रलंबित वन हक्क पट्टे मंजूर करणे. (अपिल वगळून), दिव्यांग प्रमाणपत्र देणे, त्यासोबतच नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र देणे, विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे यांचा समावेश 'सेवा महिना' उपक्रमात करण्यात आला आहे.

या सेवा महिन्यात संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या व १५ सप्टेंबर २०२३ रोजी प्रलंबित असलेल्या सर्व अर्जाचा मोहीम स्वरुपात निपटारा करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी त्यांची वरील विविध प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी शासन यंत्रणेकडे पाठपुरावा करावा. आपले सरकार सेवा पोर्टल, महावितरण पोर्टल, डी. बी. टी. पोर्टल, नागरी सेवा केंद्र, सार्वजनिक तक्रार पोर्टल, विभागाच्या स्वत:च्या संकेतस्थळावरील प्रलंबित अर्ज, सेवा महिन्यामध्ये यावर्षी नमूद केलेल्या सेवांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. आधार कार्ड सुविधा, पॅन कार्ड सुविधा, नवीन मतदार नोंदणी, जन्म मृत्यू नोंद घेणे व प्रमाणपत्र देणे, शिकाऊ चालक परवाना, रोजगार मेळावा, महिला बचत गटास परवानगी देणे, महिला बचत गटास प्राधान्याने रोजगार उपलब्ध करून देणे, सखी किट वाटप, लसीकरण, जेष्ठ नागरिक प्रमाणपत्र प्रशिक्षित उमेदवारांना रोजगार उपलब्ध करून देणे यांचा समावेश आहे. सेवा महिन्यामध्ये प्रामुख्याने सर्वसामान्य जनतेशी निगडीत असणाऱ्या महसूल विभाग, ग्रामविकास विभाग, नगर विकास विभाग, कृषी विभाग, आदिवासी विकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, ऊर्जा विभाग या विभागांकडील तसेच सर्व शासकीय विभागाकडील सेवा हक्क अधिनियमाअंतर्गत अधिसूचित केलेल्या सेवाविषयी प्रलंबित कामांचा विहित कालमर्यादेमध्ये निपटारा करण्यासाठी कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार अंमलबजावणी करण्यासाठी सर्व संबंधित अधिकारी उपस्थित राहणार आहेत. तसेच त्यासंबंधीच्या सूचनाही निर्गमित करण्यात आल्या आहेत. सेवा महिना कालावधीत विशेष शिबिरांचे आयोजन, त्यामधील नागरिक आणि प्रशासनाचा मोठ्या प्रमाणावर सहभाग राहणार आहे. सेवा महिन्यात जास्तीत जास्त नागरिकांना सहभागी करून घेत त्यांच्या समस्या निकाली काढण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. या सेवा महिन्यात सर्व विभागांच्या जनतेशी निगडीत असणाऱ्या सर्व सेवा विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देत तसेच सर्व विभागांच्या वैयक्तिक लाभाच्या सर्व योजनांचा निधी लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये थेट हस्तांतरीत करण्यात येणार आहे.

# आताघरबसल्या काढा आयुष्मान कार्ड

## पाच लाखाचे मोफत आरोग्य विमा कवच

## पात्र लाभार्थी व्यक्तींना लाभ घेण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

देशात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेची सुरुवात दि.२३ सप्टेंबर २०१८ मध्ये करण्यात आली. या योजनेअंतर्गत लाभार्थी व्यक्तीस प्रति कुटुंब, प्रति वर्ष रु. ५ लाखाचा आरोग्य विमा देण्यात येतो. याअंतर्गत एकूण १२०९ उपचार/शस्त्रक्रियेचा समावेश करण्यात आला असून देशातील शासकीय आणि अंगीकृत खाजगी रुग्णालयांच्या माध्यमातून मोफत लाभ पुरविण्यात येतो. सदर योजनेचा लाभ लाभार्थींनी मिळविण्याकरीता योजनेचे आयुष्मान कार्ड असणे गरजेचे आहे. पात्र लाभार्थी सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणना २०११ च्या यादीनुसार निवडण्यात आले असून यामध्ये राशन दुकानातून राशन घेणाऱ्या कुटुंबाच्या नावाचा देखील समावेश करण्यात आला आहे.

जिल्ह्यात एकूण ९ लक्ष ७० हजार ३८ लाभार्थी कुटुंबाचा समावेश असून ३ लाख ४७ हजार ६२२ म्हणजेच, ३६ टक्के लाभार्थ्यांचे आयुष्मान कार्ड आतापर्यंत काढण्यात आले आहे. तर उर्वरित ६ लक्ष २२ हजार ४१६ पात्र लाभार्थी व्यक्तींचे कार्ड काढण्याची प्रक्रिया सुरू आहे. आयुष्मान कार्ड काढण्याकरीता आधार कार्डची आवश्यकता असून वेबलिंक https://beneficiary. nha.gov.in किंवा मोबाईलमध्ये आयुष्मान पच्या सहाय्याने तसेच ग्रामपंचायत येथे आपले सेवा सरकार केंद्र, सीएससी सेतू केंद्र आणि आशा स्वयंसेविका मार्फत मोफत काढण्यात येत आहे.घरबसल्या काढा आयुष्मान कार्ड : वेबलिंक https://beneficiary. nha.gov.in किंवा मोबाईलमध्ये आयुष्मान पच्या सहाय्याने पात्र लाभार्थी स्वतःचे किंवा इतर पात्र लाभार्थी व्यक्तीचे आयुष्मान कार्ड काढू शकतो. याकरीता लाभार्थ्याजवळ अँड्रॉइड ९.० वर्जन असलेला मोबाईल असणे आवश्यक आहे.आयुष्मान कार्ड स्वतः काढण्याची पद्धत : मोबाईलमध्ये गुगल प्ले-स्टोअर मधून आयुष्मान प डाऊनलोड व इन्स्टॉल करणे गरजेचे आहे. त्यानंतर आधार फेस आरडी प इंस्टॉल करावे. आयुष्मान पमध्ये बेनिफिशरी लॉगीन पर्यायाची निवड करावी. मोबाईल ओटीपीच्या सहाय्याने लॉगीन करावे. त्यानंतर सर्च पर्यायांमध्ये नाव, आधारकार्ड क्रमांक आणि राशनकार्ड ऑनलाइन आयडी (आरसीआयडी) द्वारे पात्र लाभार्थी शोधता येते. पात्र लाभार्थ्यांची ई-केवायसी आधार कार्डशी संलग्न मोबाईल क्रमांकावर ओटीपी किंवा फेस ऑथ (लाभार्थी यांचा मोबाईलद्वारे फोटो) च्या माध्यमातून पूर्ण करता येते.आयुष्मान कार्ड कोण काढू शकते : आपले सरकार केंद्र, आशा स्वयंसेविका, योजनेच्या अंगीकृत रुग्णालयातील आरोग्य मित्र आणि स्वतः लाभार्थी आयुष्मान कार्ड काढू शकतात.आयुष्मान कार्डचे लाभ : प्रति कुटुंब, प्रति वर्ष ५ लाख पर्यंतच्या आरोग्य सुविधा मोफत, १२०९ आजारांचा उपचाराकरीता समावेश तसेच देशातील सर्व शासकीय अंगीकृत खाजगी रुग्णालयात लाभ घेता येतो.अधिक माहितीकरीता आपल्या नजीकचे शासकीय रुग्णालय, आरोग्य केंद्र, ग्रामपंचायत तसेच अंगीकृत खाजगी रुग्णालयातील आरोग्य मित्राशी संपर्क साधावा. सर्व पात्र लाभार्थी व्यक्तींनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन आपले आयुष्मान कार्ड त्वरित काढून घ्यावे. जेणेकरून, आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा अत्यावश्यक वेळेस तात्काळ लाभ घेण्यास मदत होईल, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

प्रधानमंत्री जन आरोग्य योजना
आयुष्मान भारत
PM-JAY

## शेगांव (खुर्द) येथील वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रार्थना मंदिर व अभ्यासिकेचे उद्घाटन

**वरोरा । प्रतिनिधी**



शेगांव (खुर्द) येथील नवीन बांधकाम पुर्ण झालेल्या ईमारतीत वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रार्थना मंदिर व अभ्यासिका सुरू करण्यात आली. या उद्घाटन सोहळ्याचे उद्घाटन डॉ. प्रकाश महाकाळकर गटशिक्षणाधिकारी भद्रावती यांच्या हस्ते झाले तर सहउद्घाटक म्हणून ज्ञानेश्वर चहारे गटशिक्षणाधिकारी वरोरा हे उपस्थित होते , या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अविनाश मेश्राम ठाणेदार पोलीस स्टेशन शेगांव (बु) हे उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी अभ्यासिकेच्या माध्यमातुन आपले ध्येय गाठावे , असे प्रतिपादन डॉ प्रकाश महाकाळकर यांनी केले. विद्यार्थ्यांनी अभ्यासिकेचा उपयोग सातत्याने करावा , असे अविनाश मेश्राम या प्रसंगी म्हणाले. या अभ्यासिका करिता 'एक पुस्तक गावासाठी ' ही नवी संकल्पना शेगांव (खुर्द) चे युवा सरपंच मोहित लभाने यांनी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बोलतांना मांडली.गावातील तरूणी कुमारी सारिका मधुकर जिवतोडे हिची बी एस एफ मध्ये निवड झाल्यामुळे श्री गुरूदेव सेवा मंडळ शेगांव (खुर्द) व ज्ञानेश्वर चहारे गटशिक्षणाधिकारी वरोरा यांच्याकडून शाल, सन्मानपत्र व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. प्रार्थना मंदिर व अभ्यासिका सुरू झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. लोकसहभाग, गावातील जनतेचे श्रमदान तसेच वेगवेगळ्या पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांची साथ लाभली त्यामुळे आपण हे कार्य पार पाडू शकलो , असे मत चंद्रशेखर भिवदरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना मांडले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून राऊत विस्तार अधिकारी शिक्षण वरोरा, अंबादासजिवतोडे सर्वाधिकारी श्री गुरूदेव सेवा मंडळ शेगांव (खुर्द), बाबुलालजी आत्राम पोलीस पाटील, अनिल मत्ते केंद्र प्रमुख तथा मुख्याध्यापक जि प उच्च प्राथमिक शाळा शेगांव (खुर्द), शिरपुरकर ग्रामसेवक शेगांव (खुर्द) हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू मांडवकर यांनी केले तर आभार प्रदर्शन विकास हजारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामपंचायत कमेटी, श्री गुरूदेव सेवा मंडळ, विकास ग्रुप, शाळा व्यवस्थापन समिती तसेच संपूर्ण शेगांव (खुर्द) ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

### आज पंढरपूर येथे राज्यस्तरीय कृषी निविष्ठा विक्रेते मेळावा

## कृषिमंत्री धनंजय मुंडे यांची प्रमुख उपस्थिती तर अध्यक्षस्थानी मा.आ.दिपकआबा साळुंखे पाटील

**सांगोली । प्रतिनिधी**

राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि सोलापूर जिल्ह्याचे मा. आम. दीपक आबा साळुंखे पाटील यांच्या अध्यक्षीय उपस्थितीने पंढरपूर येथे आज शुक्रवार ६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता राज्यस्तरीय कृषी निविष्ठा विक्रेते मेळावा आयोजित केला असल्याची माहिती कृषी निविष्ठा विक्रेते संघटनेचे तालुकाध्यक्ष सत्यवान घाटूळे यांनी दिली.

या राज्यस्तरीय मेळाव्यास महाराष्ट्र फर्टीलायझर्स पेस्टिसाइड अँड सीड्स डीलर्सचे अध्यक्ष विनोद तराळ पाटील, सोलापूरचे खासदार जयसिद्धेश्वर महास्वामी, राज्याचे कृषी आयुक्त सुनील चव्हाण, तसेच महाराष्ट्र फर्टीलायझर्स पेस्टिसाइड अँड डीलर्स असोसिएशनचे महासचिव विपिन कासलीवाल हे उपस्थित राहणार




आहेत. याचबरोबर आमदार बबनदादा शिंदे, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, आमदार सुभाष देशमुख, आमदार शहाजीबापू पाटील, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार प्रणितीताई शिंदे, आमदार राजाभाऊ राऊत, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार संजय मामा शिंदे, आमदार राम सातपुते, आमदार समाधान आवताडे, आमदार यशवंत माने, माजी आमदार प्रशांत परिचारक, राज्याचे कृषी संचालक विकास पाटील, विभागीय कृषी सहसंचालक बसवराज बिराजदार, रफिक नायकवडी जिल्हा अधीक्षक कृषी दत्तात्रय गावसाने, जिल्हा कृषी अधिकारी परमेश्वर वाघमोडे या मान्यवरांची ही राज्यस्तरीय कृषी निविष्ठा विक्रेते मेळाव्यास उपस्थिती लाभणार आहे.राज्यातील कृषी क्षेत्रातील अनेक महत्त्वाच्या विषयावर या राज्यस्तरीय मेळाव्यात सविस्तर चर्चा केली जाणार आहे तरी सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांनी या राज्यस्तरीय मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महाराष्ट्र फर्टीलायझर्स पेस्टिसाइड अँड सीड्स डीलर्स असोसिएशन यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पोंभुर्णा तालुक्याच्या जीनियस सोहमला बाजार समिती संचालकाची आर्थिक मदत



**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

पोभुर्णा तालुक्यातील डोंगर हळदी(तू) येथील जिल्हा परिषद शाळेचा विद्यार्थी सोहम सुरेश उईके व चंद्रपूरचे एसपी रवींद्रसिंह परदेशी यांच्यात मागील महिन्यात सहज रंगलेल्या संवादाचा व्हिडिओ समाज माध्यमावर तुफान वायरल झाला होता.या व्हिडिओमध्ये सोहमची आयएएस बनवण्याची जिद्द, त्याने अभ्यासाचे नियोजन, बौद्धिक क्षमता पाहून दस्तूरखुद्द पोलीस अधीक्षक अवाक झाले.दहा दिवसांनी एसपींनी सोहमला चंद्रपूर भेटीचे निमंत्रण दिले.सोहम आणि त्याची आई शालू आणि मामा देविदास मेश्राम हे तिघे एसपींच्या भेटीला गेले व आयएएस विवेक जॉन्सन यांचीही भेट घेतली.सोहमचा सन्मान करत कौतुक केला. त्याचीच दखल घेत गोंडपिपरी येथील बाजार समितीचे संचालक प्रतिष्ठित व्यापारी सुहास माडूरवार यांनी गोंडपिपरी येथे स्पर्धा परीक्षा कायदेविषयक मार्गदर्शन कार्यक्रमाच्या निमित्ताने आलेल्या रवींद्रसिंह परदेशी यांना सोहम करीता ३१०० रुपयांची ची मदत शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी केली.ती मदत सोहम पर्यंत पोहचविण्याची विनंती करत यापुढेही मदत करण्याचे आश्वासन दिले त्यांच्या सामाजिक कार्याची सर्वत्र कौतुक होत आहे.यावेळी ठाणेदार जीवन राजगुरू,उपविभागीय अधिकारी शेवाळे,नायब तहसीलदार मडामे,लक्ष्मणराव कुंदोजवार संस्थेचे सर्वेसर्वा अजय माडुरवार,प्रा बामनकर,प्रा नागपुरे यांची उपस्थिती होती

## १६ ऑक्टोबर रोजी महिला लोकशाही दिनाचे आयोजन

**गडचिरोली । प्रतिनिधी**

समस्याग्रस्त व पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे, त्यांच्या हक्काचे संरक्षण होऊन न्याय मिळावा, यादृष्टीने महिलांच्या तक्रार,अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी व समाजातील पिडीत महिलांना सुलभ मार्गदर्शनासाठी शासनाने महिला लोकशाही दिवस साजरा करण्याकरिता सुचित केले आहे. त्याअनुषंगाने जिल्हा स्तरावर महिला लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. सोमवार, दि. १६ ऑक्टोबर २०२३ रोजी सोमवार सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्या दालनात जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकशाही दिनी न्याय प्रविष्ठ प्रकरणे, सेवा विषयक, आस्थापना विषयक बाबी असे प्रकरण स्विकारण्यात येणार नाहीत. तरी ज्या महिलांचे वरिल बाबी सोडून तक्रार निवेदन वैयक्तीक स्वरुपाचेअसतील अशा महिलांचे अर्ज १५ दिवसांपूर्वी विहीत नमुण्यात असलेले अर्ज दोन प्रतीत, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय येथे स्विकारण्यात येईल. जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनामध्ये तक्रार अर्जाचा नमुना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, गडचिरोली, बॅरेक क्र.१ खोली क्र.२६ व २७ कलेक्टर कॉम्प्लेक्स गडचिरोली या कार्यालयात नि:शुल्क उपलब्ध होईल, याची नोंद घ्यावी, असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी कळविले आहे.

## वन्यजीव सप्ताहाच्या निमित्ताने मिनी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

**गडचिरोली । प्रतिनिधी**

दिनांक १ ऑक्टोबर २०२३ रोजी वन्यजीव सप्ताहच्या निमित्ताने सामाजिक वनीकरण विभाग, गडचिरोली यांच्या वतीने जनजागृतीपर मिनी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक १ ऑक्टोबर ते ७ ऑक्टोबर पर्यंत वन्यजीव सप्ताह संपूर्ण देशात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. वन्यजीव विषयी लोकांमध्ये जनजागृती होऊन वन्य प्राण्यांबद्दल आस्था निर्माण व्हावी म्हणून गडचिरोलीच्या सामाजिक वनीकरण विभागामार्फत मिनी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर स्पर्धेमध्ये एकूण ९६ मुले व ६० मुलींनी सहभाग नोंदविला. मुलांमध्ये ५ किमी मध्ये प्रथम नागेश्वर संजय रस्से, द्वितीय अमोल रवींद्र पोरते, तृतीय सूरज साईनाथ बोटरे तर मुलींमध्ये ३ किमी मध्ये प्रथम पायल दिलीप मांदाळे, द्वितीय जानवी दिलीप हजारे, व तृतीय पौर्णिमा आतला हे आले. प्रथम आलेल्या स्पर्धकाला ट्रॅक सूट, द्वितीय स्पर्धकाला स्पोर्ट शूज, व तृतीय आलेल्या स्पर्धकाला स्पोर्ट बॅग देण्यात आली. इतर सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्राने गौरवण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन उपवनसंरक्षक पवन जोंग व विभागीय वन अधिकारी सोनल भडके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विभागीय वनाधिकारी (दक्षता) गणेश पाटोळे, सहाय्यक वनसंरक्षक करिश्मा कवडे, सहायक वनसंरक्षक प्रतीक्षा काळे, निवृत्त विभागीय वनाधिकारी शंकर बिलोलीकर तसेच गडचिरोलीचे वनपरिक्षेत्र अधिकारी अरविंद पेंदाम उपस्थित होते. या स्पर्धेचे आयोजन सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी गणेश झोळे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्राधिकारी धीरज ढेंबरे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन वनपाल पेंदोरकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार वनरक्षक दुर्गम वार यांनी मानले. यावेळी वनपाल देगावे, वासेकर, गड्डमवार, नवघरे, जनबंधू, विद्या उईके, वनरक्षक खुळसंगे, तातावर, अलोने, कांबळे, वाढई, राठोड तसेच सामाजिक वन विभागाचे वनमजून आदी उपस्थित होते.

## शारदाबाई लक्षणे यांचे निधन


**कन्हान । प्रतिनिधी**



येथून जवळच असलेल्या खंडाळा (घ) येथील प्रतिष्ठित नागरिक वासुदेवराव बालचंदजी लक्षणे यांच्या पत्नी शारदाबाई वासुदेव लक्षणे यांचे आज दिनांक ५ ऑक्टोबरला हृदयविकाराने दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६७ वर्षाच्या होत्या. त्यांच्यावर खंडाळा (घ) येथील स्मशानघाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले. नाभिक एकता मंचाचे तालुका अध्यक्ष सुनील लक्षणे यांच्या त्या मातोश्री होत. यानिमित्ताने झालेल्या शोकसभेत त्यांच्या व्यक्तित्वावर अनेकांनी प्रकाश टाकला. प्रेमळ व्यक्तिमत्त्व आपल्यातून निघून गेल्याची खंत भाषणातून अनेकांनी व्यक्त केली. त्यांच्या पश्चात मुले राजेंद्र, देवानंद, सुनील आणि मुलगी मीना राजू मिराशे, सुना, नातवंडे आणि बराच मोठा आप्तपरिवार आहे.

## चेकदरुर ग्रामपंचायतीच्या नवनियुक्त सरपंच पदी अमोल भोयर यांची बिनविरोध निवड

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**



गोंडपिपरी तालूक्यातील चेकदरूर ग्राम पंचायतीच्या सरपंच पदी अमोल भोयर यांची बिन विरोध निवड करण्यात आली. सरपंच निवडी साठी चेकदरुर ग्रामपंचायत कार्यालयामध्ये दि.(५) गुरुवारी बैठक घेण्यात आली.सरपंच पदासाठी अमोल भोयर यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाला होता.निवडणूक निर्णय अधिकारी तथा मंडळ अधिकारी मगरे यांनी अमोल भोयर यांची सरपंच पदी बिनविरोध निवड झाल्याची घोषणा केली. यावेळी तलाठी पगाडे, सर,पो.पा.अनिल वासलवार,ग्रामसेवक चौधरी,उपसरपंच सुनिता कोटगले,रविंद्र पाल ग्रा. पं सदस्य, गणपत नागापुरे ग्रां पं.सदस्य,गौतम धुरके ग्रा पं सदस्य,स्नेहा भोयर ग्रा पं सदस्य,संगीता झाडे ग्रा पं सदस्या, अर्चना चौधरी ग्रा पं सदस्य, प्रज्ञा देठे उपस्थित होते

## शहर-ग्रामीण भागात विजेचा लपंडाव : भाकपाचे निवेदन

**भद्रावती । प्रतिनिधी**

गेल्या अनेक महिन्यांपासून शहर आणि ग्रामीण भागात विजेचा लपंडाव सुरू असल्याने नागरिक तसेच शेतकरी त्रस्त आहेत. या संदर्भात भारतीय कम्युनिस्ट पक्षाने मराविवि कंपनीचे उप कार्यकारी अभियंता यांना निवेदन देऊन या समस्येकडे लक्ष देण्यास सांगितले.

हलकासा पाऊस-वादळ आल्याबरोबर शहर तसेच ग्रामीण भागातील वीज खंडित होण्याचा प्रकार नेहमीचाच झाला आहे. त्याचे जोडीला आता दिवसाला ५ ते ८वेळा वीज खंडित होण्याचा प्रकार सुरू झाला आहे .त्यामुळे नागरिकांना उकाड्याचा तर शेतकऱ्यांना पिकांना पाणी देण्याचा त्रास होत आहे .या संदर्भात भाकपाचे जिल्हा सहसचिव कॉम्रेड राजू गैनवार यांनी मराविवि कंपनीचे उपकार्यकारी अभियंता कांबळे यांना निवेदन देऊन समस्या सोडविण्यास सांगितले.

# जिल्हाप्रमुख जिवतोडे यांच्या नेतृत्वात वरोरा तालुक्यात होऊ द्या चर्चा कार्यक्रम

## सरकारच्या योजना फक्त बॅनर आणि कागदावरच–उपनेते मनोज जामसुतकर





**वरोरा । प्रतिनिधी**

केंद्र सरकार व राज्य सरकार वतीने सुरू करण्यात आलेल्या योजना फक्त कागदावर, मोठ मोठाले बॅनर आणि टीव्ही चॅनलला जाहिराती देण्या एवढ्याच मर्यादित राहिल्या असून सर्व योजना सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचल्या जात नाही. या सर्व योजना फसव्या आहे. असे वक्तव्य शिवसेना ( उबाठा) उपनेते तथा कामगार नेते व माजी नगरसेवक मनोज जामसुतकर यांनी शेंबड येथे आयोजित होऊ द्या चर्चा कार्यक्रमात सरकारच्या फसव्या योजनांचा भांडाफोड कार्यक्रमा दरम्यान केले.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्र केंद्र सरकार व राज्य सरकारच्या फसव्या योजनाचा भांडाफोड करण्यासाठी होऊ द्या चर्चा, करूया बोलवेड्या हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. वरोरा तालुक्यातील सुद्धा शिवसेना उपनेते तथा कामगार नेते व माजी नगरसेवक मनोज जामसुतकर व माजी नगरसेवक सूर्यकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात होऊ द्या चर्चा कार्यक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमादरम्यान जिल्हाप्रमुख म्हणाले की, केंद्र सरकार व राज्य सरकारच्या योजना फक्त धनाढ्य लोकांसाठी लमलात आण्यात येते. एकीकडे शेतकरी बांधव कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करत आहे. मात्र हे सरकार शेतकऱ्याचे कर्ज माफ न करता उद्योगपती यांचे कर्ज माफ करते.भाजप सरकारच्या काळात २०१६ मध्ये एनसीएलटी कायदा अस्तित्वात आणून याचा फायदा फक्त मोठ मोठ्या कारखानदार लोकांना देण्यात आला. यामुळे अनेक कारखाने दिवाळखोरीत काढून हजारो लोकांना बेरोजगार करण्यात आले. सरकार गोरगरीब लोकांना फक्त गांजर दाखवून फसव्या योजनांचा प्रचार प्रसार करतात.याचाच भांडाफोड करण्यासाठी शिवसेना वरोरा – भद्रावती विधानसभेतील गावा गावात जाऊन या फसव्या योजनांना भांडाफोड करणार असल्याची माहिती याप्रसंगी देण्यात आली.यावेळी, मुंबई युवासेना समन्वयक अमीत जाधव, उदय ,उपजिल्हा प्रमुख अमित निब्रड, युवासेना जिल्हा समन्वयक दिनेश यादव, विधानसभा संघटक सुधाकर मिलमीले,तालुका प्रमुख विपीन काकडे,शहर प्रमुख संदीप मेश्राम, उपशहर प्रमुख मनीष दोहतरे, कंत्राटी कामगार सेना तालुका प्रमुख हनुमान ठेंगणे शेंबड येथील सरपंच बालाजी जिवतोडे, माजी उपसरपंच महादेव जीवतोडे, माजी उपसरपंच प्रदीप मत्ते, तंटामुक्ती अध्यक्ष महादेव घागी, प्रकाश कुरेकर, निलेश जीवतोडे, सुरेंद्र जीवतोडे, सुरज घागी, सचिन बोढाले, प्रशांत जोगी, शाखा प्रमुख लोकेश धाबेकर, सचिन आसुटकर, प्रवीण जीवतोडे, उपसरपंच ज्योती मेश्राम, मनीषा मते, शोभा कुरेकर, भावना कूरेकार, आदी शिवसैनिक, युवासैनिक, महिला आघाडी, युवतीसेना व आदी उपस्थित होते.

## चेकलिखितवाडा ग्रामपंचायतीवर भाजपची सत्ता

### पुष्पा राऊत यांची सरपंचदी अविरोध निवड

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**



तालुक्यातील चेकलिखितवाडा येथे सुरवातीचे अडीच वर्ष काँग्रेसची सत्ता राहिली.येथिल सरपंचानी राजीनामा दिला.यानंतर रिक्त झालेल्या जागेवर सरपंच पदासाठी गुरुवारी(दि.५) निवडणूक पार पडली.यावेळी भाजपने बहूमताचे सदस्य आपल्याकडे ठेवल्याने विरोधकांनी सरपंचपदाच्या निवडणूकीत भाग घेतलाच नाही.यामूळे भाजपच्या सरपंचपदाच्या निवडीत पुष्पा राऊत यांची अविरोध निवड झाली.आणि चेकलिखितवाडा ग्रामपंचायतीवर भगवा फडकला.भाजपा नेते,माजी जि.प.सदस्य अमर बोडलावार यांचे कुशल मार्गदर्शन आणि नेतृत्वात भाजपने चेकलिखितवाडा गावात सरपंचपद मिळविले.निवडीदरम्यान कोमल फरकडे,प्रभाकर कोहपरे,प्रतिमा चंद्रगिरीवार हे ग्रा.पं.सदस्य सरपंच पदाच्या बाजूने राहिले.यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती इंद्रपाल धुडसे,उपसभापती स्वप्निल अनमुलवार,संचालक सुहास माडूरवार,भाजपचे गोंडपिपरी शहरध्यक्ष तथा नगरसेवक चेतनसिंह गौर,संदिप पौरकार आदिसह वामण गेडाम,सुनिल फरकडे,रत्नाकर गेडाम,प्रकाश गावडे,निलकंठ राऊत,दिपक नेवारे,रविंद्र नेवारे,बंडू चंदनगिरीवार,रुपेश राऊत,सुरेश अंबाडरे,राहूल सरवर,मोहण ढूमणे,लक्ष्मण मडपल्लीवार यांची उपस्थिती होती.

## १६५ कोटी रुपयांच्या बनावट विक्री बिलांच्या प्रकरणी दोन जणांना अटक

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र वस्तू व सेवाकर विभागाने १६५.७८ कोटी रुपयांच्या बनावट विक्री बिलांच्या आधारे बोगस इनपुट टॅक्स क्रेडिट (आय टी सी ) संदर्भात शासनाची २७.७४ कोटी रुपयांच्या कर महसुलाची हानी करणाऱ्या दोन व्यक्तींना अटक करण्यात आली आहे, अशी माहिती मुंबईच्या राज्यकर सहआयुक्त (अन्वेषण– अ) प्रेरणा देशभ्रतार यांच्यावतीने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये देण्यात आली आहे.

मे. श्री समस्ता ट्रेडिंग प्रा. लि. व शरद क्लिअरिंग ण्ड फॉरवर्डिंग प्रा. लि. या व्यापाऱ्यांच्या विरोधात राज्य शासनाच्या वस्तू व सेवाकर विभागाकडून कर चोरी विरोधी विशेष अन्वेषण कारवाई सुरू



करण्यात आली होती. या कारवाईदरम्यान बनावट कंपन्यांची स्थापना करून बोगस बिल देण्याचे काम सुरू असल्याचे निदर्शनास आले. यासंदर्भात वस्तू व सेवाकर विभागाकडून बोगस बिलासंदर्भात मोहीम राबवीत प्रमुख सूत्रधार राहुल अरविंद व्यास व विकी अशोक कंसारा यांना ४ ऑक्टोबर २०२३ रोजी अटक करण्यात आली. त्यांना महानगर दंडाधिकाऱ्यांनी १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.सर्व समावेशक नेटवर्क विश्लेषण साधनांचा वापर करून आणि इतर विभागांशी समन्वय साधून महाराष्ट्र वस्तू व सेवाकर विभाग कर चुकविणाऱ्या व्यापाऱ्यांचा शोध घेत आहे. बोगस व्यापार करून कर चुकवेगिरी करणाऱ्या व्यापाऱ्यांमुळे बाजारपेठेतील स्पर्धा नष्ट होऊन योग्य व्यवसाय करू इच्छिणाऱ्या व्यापाऱ्यांना नुकसान सहन करावे लागत आहे. मात्र, या दोन जणांच्या अटकेतून महाराष्ट्र वस्तू व सेवाकर विभागाने कर चुकवेगिरी करणाऱ्यांना इशारा दिला आहे, असेही प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे

## जिल्हा परिषदेतील रिक्त पदांची पदभरती : ७ ते ११ ऑक्टोबर दरम्यान विविध परीक्षा केंद्रावर परीक्षेचे आयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद, चंद्रपूर मधील रिक्त पदांची पदभरती जाहिरात दि. ५ ऑगस्ट २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्याअनुषंगाने ८ संवर्गाची संगणकीय परीक्षा आयबीपीएस कंपनीमार्फत दि. ७ ते ११ ऑक्टोबर २०२३ या दरम्यान चंद्रपूर जिल्ह्यातील विविध परीक्षा केंद्रावर आयोजित करण्यात आली आहे.



७ ऑक्टोबर २०२३ रोजी, रिंगमन (दोरखंडवाला) आणि वरिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदासाठी पुजा इन्फोसिस्टिम चंद्रपूर, इंडस्ट्रियल एरिया, बंगाली कॅम्प, चंद्रपूर या ठिकाणी परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे.८ ऑक्टोबर रोजी विस्तार अधिकारी (सांख्यिकी) या पदासाठी कोटकर इन्फोसिस्टिम, ट्राय स्टार हॉटेलच्या मागे, सीटीपीएस रोड चंद्रपूर, पुजा इन्फोसिस्टीम चंद्रपूर आणि श्री. साई पॉलीटेक्निक ट्रायस्टार हॉटेल जवळ चंद्रपूर या ठिकाणी, १० ऑक्टोबर रोजी विस्तार अधिकारी (कृषी) या संवर्गासाठी कोटकर इन्फोसिस्टीम, ट्रायस्टार हॉटेलच्या मागे, सीटीपीएस रोड चंद्रपूर, पुजा इन्फोसिस्टिम चंद्रपूर, इंडस्ट्रियल एरिया, बंगाली कॅम्प, चंद्रपूर,श्री. साई पॉलीटेक्निक ट्रायस्टार हॉटेल जवळ चंद्रपूर आणि बजाज पॉलिटेक्निक बालाजी वार्ड, चंद्रपूर या ठिकाणी. तर त्याचदिवशी १० ऑक्टोबर २०२३ रोजी आरोग्य पर्यवेक्षक पदासाठी कोटकर इन्फोसिस्टीम ट्रायस्टार हॉटेलच्या मागे, सीटीपीएस रोड, चंद्रपूर या ठिकाणी परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे.११ ऑक्टोबर २०२३ रोजी लघुलेखक (निम्न श्रेणी) व लघुलेखक (उच्च श्रेणी) पदासाठी कोटकर इन्फोसिस्टीम, ट्रायस्टार हॉटेलच्या मागे, सीटीपीएस रोड चंद्रपूर या ठिकाणी तर त्याचदिवशी ११ ऑक्टोबर रोजी कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदासाठी पुजा इन्फोसिस्टीम चंद्रपूर, इंडस्ट्रियल एरिया, बंगाली कॅम्प, चंद्रपूर, श्री. साई पॉलीटेक्निक ट्रायस्टार हॉटेल जवळ चंद्रपूर, कोटकर इन्फोसिस्टीम, ट्रायस्टार हॉटेलच्या मागे, सीटीपीएस रोड चंद्रपूर तसेच बजाज पॉलिटेक्निक बालाजी वार्ड, चंद्रपूर या ठिकाणी परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी, असे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी कळविले आहे.

## जिल्हास्तरीय आंतरशालेय क्रिकेट स्पर्धेत विद्याविहार कॉन्व्हेंटने मारली बाजी



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर महानगर जिल्हास्तरीय आंतरशालेय क्रिकेट स्पर्धेत विद्याविहार कॉन्व्हेंट हायस्कुल चंद्रपूर येथील १७ वर्षाखालील वयोगटातील खेळाडूंनी माऊंट कारमेल कॉन्व्हेंट चंद्रपूरच्या चमूवर मात करीत बाजी मारली. सदर विजयी चमूची विभागीय स्तरावर निवड झाल्याने ही चमू वर्धा येथे आयोजित विभागीय क्रिकेट स्पर्धेत सहभागी होणार आहे.

विद्याविहार कॉन्व्हेंट हायस्कुलच्या या क्रिकेट चमूतील ओम ठाकुर (कर्णधार), अमन भट्ट, आशय बनकर, अभिनव बारसागडे, शंतनू विझे, मयंक कुशवाह, गौरव गेडाम, राघव शर्मा, (उपकर्णधार) अंशुल तागडे, किश नौकरकर, केतन शिरपूरे यांनी बहारदार कामगीरी बजावून घवघवीत यशाला गवसणी घातली. प्राचार्या शोभा रेड्डी यांच्या मार्गदर्शनात क्रीडा शिक्षक माहुरे, यांच्या अनुभवी नेतृत्वात विद्याविहारने हे यश संपादन केले.विजयी विद्यार्थी चमूचे प्राचार्या शोभा रेड्डी , संस्थेचे अध्यक्ष रेड्डी , कृष्णा रेड्डी, शिक्षक व कर्मचारीवृंद तसेच पालक व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

## धम्मचक्र अनुप्रवर्तन समारंभाच्या पूर्व तयारीचा जिल्हाधिका-यांनी घेतला आढावा



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरिअल सोसायटी, दीक्षाभूमि, चंद्रपूरद्वारे १५ आणि १६ ऑक्टोबर २०२३ रोजी ६७ वा धम्मचक्र अनुप्रवर्तन समारंभ साजरा करण्यात येणार आहे. या समारंभाच्या पूर्वतयारीबाबत जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी आढावा घेऊन विविध विभागांना सुचना केल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी, अतिरिक्त पोलिस अधिक्षक रिना जनबंधू, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार, उपविभागीय पोलिस अधिकारी नंदनवार, कार्यकारी अभियंता सुनील कुंभे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरीयल सोसायटीचे अध्यक्ष अरूण घोटेकर, राहुल घोटेकर, प्राचार्य दहेगांवकर, प्रा. मनोज सोनटक्के आदी उपस्थित होते.यावेळी जिल्हाधिकारी म्हणाले, दीक्षाभूमिकडे जाणा–या नागरिकांच्या आवागमनास अडथळा होऊ नये तसेच रस्त्यावर गर्दी होऊ नये म्हणून योग्य बॅरीकेटींग करावी. बाहेरून येणा–या बसेसकरीता पार्किंगची योग्य व्यवस्था करावी. बसेस निघण्यासाठी मोकळी जागा असणे आवश्यक आहे. त्याच्यासमोर दुचाकी किंवा चारचाकी वाहनांची पार्किंग होऊ देऊ नका. रस्त्यांची डागडूजी, दुरुस्ती त्वरीत करून घ्या. मुख्य कार्यक्रमाच्या दोन्ही दिवसांत त्या परिसरातील विद्युत व्यवस्था चोख ठेवावी. वीज पुरवठा अखंडित सुरू राहील, याबाबत दक्ष राहावे. मोठा सांस्कृतिक कार्यक्रम दीक्षाभूमिच्या प्रांगणात न घेता चांदा क्लब ग्राऊंड किंवा न्यू इंग्लीश हायस्कूलच्या मैदानावर घेण्याचे नियोजन करावे. १५ आणि १६ ऑक्टोबर रोजी मोठ्या प्रमाणात दीक्षाभूमिवर येतात. त्यामुळे येथे आरोग्य पथक, अग्निशमन सेवा, शौचालयाची व्यवस्था चोख ठेवावी. भोजनदानाचे स्टॉल लावणा–या सामाजिक संघटनांनी मुख्य रस्त्यावर कोणताही अडथळा निर्माण होणार नाही, याबाबत काळजी घ्यावी, अशा सुचना जिल्हाधिका–यांनी दिल्या.

## महाकाली महोत्सवासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे येणार चंद्रपूरात

### महोत्सव समितीच्या वतीने मुख्यमंत्री यांना निमंत्रण पत्रिका,

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

नवरात्री दरम्यान श्री. माता महाकाली महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. १९ ऑक्टोंबर पासून सुरु होणार असलेल्या या महाकाली महोत्सवाकरीता श्री. महाकाली माता महोत्सव समीतीच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निमंत्रण पत्रिका देण्यात आली असुन महोत्सवादरम्यान माता महाकालीच्या दर्शनासाठी चंद्रपूरात येणार असल्याचे यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.



यावेळी श्री. महाकाली माता महोत्सव समीतीचे अध्यक्ष तथा चंद्रपूर विधानसभा क्षेत्राचे अपक्ष आमदार किशोर जोरगेवार, उपाध्यक्ष अजय जयस्वाल, बलराम डोडाणी कोषाध्यक्ष पवन सराफ, सदस्य मधुसुदन रुंगठा, अशोक मत्ते, मिलींद गंपावार, राजू शास्त्रकार, कुक्कु सहाणी, मोहित मोदी यांची उपस्थिती होती.चंद्रपूरची आराध्य दैवत माता महाकाली ची महती राज्यभरात पोहचावी, येथील पर्यटन क्षेत्राचा विकास व्हावा यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून मागच्या वर्षीपासून चंद्रपूरात श्री. माता महाकाली महोत्सवाला सुरवात करण्यात आली आहे. मागच्या वर्षी या महोत्सवाला नागरिकांचाही उस्फुर्त प्रतिसाद लाभला होता. यंदाही १९ ऑक्टोंबर पासून महाकाली मंदिर च्या पटांगणात श्री. माता महकाली महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा सदर आयोजन पाच दिवस चालणार असून धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमांनी महोत्सवात रंगत भरणार आहे. तर २३ ऑक्टोंबरला श्री माता महाकालीची भव्य नगर पालखी प्रदक्षिणा काढण्यात येणार आहे. दरम्यान काल गुरुवारी श्री. महाकाली माता महोत्सव समीतीच्या पदाधिका–यांनी मुंबई येथील वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली असून त्यांना श्री. माता महाकाली महोत्सवाची निमंत्रण पत्रिका दिली आहे. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही या महोत्सवात उपस्थिती दर्शविणार असल्याचे म्हटले आहे. या प्रसंगी आमदार किशोर जोरगेवार आणि समितीच्या सर्व पदाधिका–यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना चुनरी व माता महाकालीची मुर्ती भेट स्वरुप दिली आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .